**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ 'विद्यावार्ता' चे राज्यपालांच्या हस्ते विमोचन

अमरावती - (दि. १३.०९.२०२२)

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने 'विद्यावार्ता' ई-मासिक सुरु करण्यात आले आहे. त्याच्या आठवड्याच्या अंकाचे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलपती श्री भगत सिंह कोश्यारी यांचे हस्ते राजभवनात विमोचन करण्यात आले. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे व कुलसचिव डॉ. तुषार देशमुख उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांना कुलगुरूपदाचा पदभार स्वीकारुन एक वर्ष पूर्ण होत आहे. त्यानिमित्ताने आणि विद्यापीठाने केलेल्या शैक्षणिक विकासासंदर्भात माहिती देण्याकरीता त्यांनी राज्यपाल महोदयांची भेट घेवून 'विद्यावार्ता' अंक त्यांना प्रदान केला. अंकाचे विमोचन केल्यानंतर अंकाबाबत प्रतिक्रिया देतांना राज्यपाल महोदय म्हणाले, अतिशय सुंदर रितीने कुलगुरू डॉ. दिलीप मालखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली 'विद्यावार्ता' अंक तयार झाला असून इतरांसाठी दिशादर्शक आहे. विद्यापीठाच्या शैक्षणिक विकासाविषयी माहिती दिल्यानंतर राज्यपाल महोदयांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी कुलगुरू व राज्यपाल महोदय यांच्यात चर्चा झाली.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १३/०९/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

This document was created with the Win2PDF “Print to PDF” printer available at

https://www.win2pdf.com

This version of Win2PDF 10 is for evaluation and non-commercial use only.
Visit https://www.win2pdf.com/trial/ for a 30 day trial license.

This page will not be added after purchasing Win2PDF.

https://www.win2pdf.com/purchase/